/.

संचारबंदी आदेश

जा.क्र.पोआ/४०८४/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड
दिनांक -१३/०७/२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक १४/०७/२०२० चे ००:०१ ते २३/०७/२०२० चे २४:०० वा. चे दरम्यान पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राकरिता संचारबंदी तसेच वाहतुक मनाई आदेश.**

१. ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २९.०६.२०२० अन्वये कोव्हिड- १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि.३१.०७.२०२० अखेर वाढविलेली आहे.

२. ज्या अर्थी संदर्भ आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्र./ वैद्य/ ९/ ४०६६/ २०२० दिनांक १२/०७/२०२० व जा.क्र./ वैद्य/ ९/ ४०७१/ २०२० दिनांक १३/०७/२०२० अन्वये आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दित कोविड १९ चा प्रतिबंधकरण्यासाठी दिनांक १४.०७.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २३.०७.०२० चे २४.०० वा चे दरम्यान संपुर्ण टाळेबंदी (लॉकडाउन) घोषीत केला आहे.

३. त्याअर्थी **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे,सर्व कृत्यास तरतुदींच्या अधिन राहुन सुधारीत सचारास मनाई व वाहतुक मनाई **दिनांक १४.०७.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २३.०७.०२० चे २४.०० वा** चे दरम्यान लागू करीत आहे.

**४. खालील बाबींना संपुर्ण मनाई राहील.**

i) शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था,सर्व प्रकारचे शिकवणी वर्ग संपुर्णतः बंद राहतील.

ii) मेट्रो / लोकल रेल्वे सेवा बंद राहतील.

iii) रेल्वे प्रवासी वाहतुक जोपर्यंत विशेष स्वतंत्र आदेशाद्वारे आणि प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (SOP) परवानगी देण्यात येणार नाही तो पर्यंत बंद राहतील.

iv) सर्व सिनेमागृहे, व्यायामशाळा/ जिम्नॅशियम, जलतरण तलाव, करमणुक उदयाने, नाटयगृहे, बार आणि सभागृहे, असेंब्ली हॉल, **मंगल कार्यालय, सार्वजनिक / खाजगी क्रिडांगणे, मोकळया जागा** आणि तत्सम ठिकाणे संपुर्णतः बंद राहतील. **तसेच सार्वजनिक ठिकाणी/ रस्त्यावर मॉर्निंग वॉक, इव्हीनिंग वॉक, जॉगिंग, शारीरक व्यायाम करण्यास मनाई राहील.**

v) सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम, **सभा** व इतर मेळावे यांना बंदी राहील.

vi) सर्व धार्मिक स्थळे/ प्रार्थना स्थळे नागरीकांसाठी बंद राहतील.

Scanned by CamScanner

vii) **लग्नसमारंभ, स्वागतसमारंभ बंद राहतील मात्र पुर्वी परवानगी घेतलेले लग्नसमारंभ २० पेक्षा कमी व्यक्तींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येतील. तसेच अंत्यसंस्कारासाठी २० पेक्षा जास्त व्यक्तींना परवानगी नाही.**

viii) केश कर्तनालय, स्पा, सलुन, ब्युटी पार्लर इत्यादी आस्थापना व सेवा संपुर्ण बंद राहतील.

ix) खाजगी कार्यालये / आस्थापना संपुर्णतः बंद राहतील.

x) उपहारगृह, लॉज, हॉटेल (वंदे भारत योजनेअंतर्गत कोविड १९ करीता वापरात असलेले वगळुन) डान्स, रिसॉर्ट संपुर्णतः बंद राहतील.

**६. खालीलबाबींना अटी व शर्तीवर परवानगी राहील.**

**अ) वाहतुक –**

- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक व खाजगी वाहतुक बंद राहील. त्यामध्ये अंतरराज्य सार्वजनिक वाहतुक, अंतरजिल्हा व अंतरराज्य बस वाहतुक, सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहने, दुचाकी, तीनचाकी व चारचाकी, ऑटो रिक्षा, सायकल रिक्षा, टॅक्सी व कॅब सेवा पुर्णतः बंद राहतील.
- **अपवाद :- अत्यावश्यक सेवेतील वाहने, पुर्वपरवानगी प्राप्त वाहने तसेच विमानतळ, रेल्वे स्टेशन येथे जाण्या येण्याकरीता व वैदयकीय कारणास्तव प्रवासासाठी खाजगी वाहनांचा वापर अनुज्ञेय राहील.**
- वस्तु, माल घेवुन जाणारे ट्रक, टेम्पो, ट्रेलर, ट्रॅक्टर इ. मालवाहतुक करणारी वाहने तसेच माल/वस्तु पोहच केल्यानंतर रिकामे ट्रक/ मालवाहु वाहन यांना परत जाण्यास परवानगी राहील.
- पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीतील मा. न्यायालयाचे कर्मचारी, अधिकारी, मा.न्यायधिश, वकील, राज्य/ केंद्रशासनाचे कर्मचारी, शासन अंगिकृत कर्मचारी, **सर्व वैदयकीय व्यावसायीक, परिचारीका, पॅरामेडीकल कर्मचारी, ॲम्बुलन्स,** अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर, वर्तमानपत्र, प्रिंटीग व डिजीटल मिडीयाचे कर्मचारी, फार्मा व औषधी संबधित मेडीकल शॉपचे कर्मचारी, **दुध विक्रेते (घरपोच वितरणासाठी परवानगी राहील.),** अत्यावश्यक सेवा जसे कृषी, बीबियाणे, खते, गॅस वितरक, पाणी पुरवठा, आरोग्य व स्वच्छता करणारे शासकीय व खाजगी कामगार, अग्निशामन सेवा, जलनिःसारण तसेच पूर्व पावसाळी व पावसाळयादरम्यान करावयाची अत्यावश्यक कामे करणारे, वीज वहन व वितरण कंपनीचे कर्मचारी, महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी, महसुल विभागाचे कर्मचारी तसेच कंन्टोमेंट झोन करीता नियुक्त कर्मचारी यांनाच चारचाकी, दुचाकी वाहन (स्वतःकरीता फक्त) कर्तव्यावर जाण्याकरिता वापरण्यास परवानगी राहील. तसेच **औदयोगीक क्षेत्रातील आस्थापना तसेच आयटी व आयटीईएस क्षेत्रातील पासधारक दुचाकी, चारचाकी व निश्चित केलेल्या बसेस यांना परवानगी असेल.** या सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी स्वतःचे कार्यालयाचे ओळखपत्रे तसेच शासकीय कर्मचारी सोडुन इतरांनी स्वतःचे आधार कार्ड सोबत ठेवावे व वाहनाचे आवश्यक परवाने सोबत ठेवावे. या सर्वांना वाहन फक्त शासकीय कामासाठी अथवा त्यांचे कामाचे जबाबदारी नुसार व शासकीय अथवा त्यांच्या संस्थेने दिलेल्या वेळेतच वापरता येईल.

**ब) उदयोग –**

- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत सर्व औदयोगिक आस्थापना हया पुर्वी प्रमाणे सुरु राहतील. तसेच महानगरपालिके क्षेत्राव्यतिरिक्त पोलीस आयुक्तालयाचे इतर हद्दीतील औदयोगिक आस्थापना पुर्वीप्रमाणे सुरु राहतील. औदयोगीक क्षेत्रात कंपन्यामध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना कामकाजाकरीता येण्याजाण्यासाठी **केवळ पासधारक दुचाकी, चारचाकी व निश्चित केलेल्या बसमधुनच प्रवासाची परवानगी असेल.** प्रतिबंधित (कंन्टेन्मेट) क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच कामावर उपस्थित राहता येईल. तसेच कोव्हीड-१९ चे अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करणे अनिवार्य राहील.

**क) आयटी व आयटीईएस –**

- पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात आयटी व आयटीईएस कंपन्या १५ % क्षमतेने चालु राहतील. कंपन्यामध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना कामकाजाकरीता येण्याजाण्यासाठी केवळ **पासधारक दुचाकी, चारचाकी व निश्चित केलेल्या बसमधुनच प्रवासाची परवानगी असेल.**
- वर्क फ्रॉम होम यांना प्राधान्य दयावे.

Scanned by CamScanner

ड)सरकारी कार्यालये, केंद्र / राज्य सरकारची स्वायत्त / अधीनस्त कार्यालये -

- अत्यावश्यक सेवा जसे पोलीस, गृह रक्षण, नागरी संरक्षण, अग्नीशामक व आपत्कालीन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, कारागृह, नगरपालिका सेवा हे सुरु राहील.
- सर्व मा.न्यायालये व राज्य शासनाचे/केंद्र शासनाचे कार्यालये तसेच शासन अंगीकृत उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र.४ नुसार दिनांक २९/०६/२०२० चे आदेशानुसार १० टक्के मर्यादित कर्मचारी वर्गासह सुरु राहतील.
- सर्व राष्ट्रीयकृत व आरबीआयने मान्यता दिलेल्या बॅका नियमानुसार किमान मनुष्यबळासह सुरु राहतील. बॅकेचे इतर ग्राहकसेवा जसे ऑनलाईन, बॅकेची एटीएम सेवा सुरु राहील.

**इ) प्रिंट मिडीया / प्रेस –**

दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालिके यांची छपाई व वितरण व्यवस्था तसेच डिजीटल/ प्रिंटमिडीया यांची कार्यालये शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्रांचे वितरण सकाळी ६ ते ९ वेळेमध्येच अनुज्ञेय राहील.

**फ) बांधकाम सेवा –**

- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सर्व प्रकारचे बांधकाम/कन्स्ट्रक्शनची कामे संपुर्णतः बंद राहतील तथापी ज्या बांधकामाच्या जागेवर कामगारांची निवास व्यवस्था असेल (इन-सीटु कन्ट्रक्शन) त्यांना परवानगीने काम सुरू ठेवता येईल.
- पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रामध्ये सुरू असलेले स्मार्ट सिटी अंतर्गत प्रकल्प, मेट्रो, स्मार्ट सिटी, राष्ट्रीय महत्वाचे प्रकल्प इ. यांचे काम संबंधित प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीसह सुरू ठेवता येईल.

**ग) मद्य विक्री –** मदय विक्रीच्या सर्व अनुज्ञप्ती बंद राहील.

**ह) शॉपींग मार्केट / दुकाने –**

- सर्व किराणा दुकान, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, सर्व इतर व्यावसाय करणारे व्यापारी दुकाने दिनांक १४ ते १८ जुलै दरम्यान बंद राहतील. तद्नंतर दिनांक १९ ते २३ जुलै कालावधीत सकाळी ०८ ते दुपारी १२ वा. पर्यंत केवळ अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी दुकाणे व त्याचे ठोक विक्रेते यांची दुकाने सुरु राहतील इतर सर्व दुकाने व आस्थापना बंद राहतील.
- **दुध विक्री व दुधाची घरपोच वितरण संपुर्ण कालावधीत अनुज्ञेय राहील.**
- **सर्व मेडीकल दुकाने २४ तास सुरू राहतील.**
- मटन, चिकन, अंडी, मासे इत्यादीची विक्री दिनांक १४/०७/२०२० ते दिनांक १८/०७/२०२० पर्यंत संपुर्णतः बंद राहतील तद्नंतर दिनांक १९/०७/२०२० ते २३/०७/२०२० याकालावधीत सकाळी ०८:०० ते दुपारी १२:०० वाजेपर्यंत चालु राहतील.

**ई) भाजी व फळे मंडई / मार्केट –**

सर्व किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा/ मंडई/ आडत भाजी मार्केट/ फळे विक्रेते/ आठवडी व दैनिक बाजार/ फेरीवाले हे सर्व ठिकाणी दिनांक १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० दरम्यान संपुर्णतः बंद राहतील. तदनंतर दि.१९/०७/२०२० ते दि. २३/०७/२०२० या कालावधीत शेतकरी आठवडी बाजार तसेच भाजी व फळांचे विक्री करणारे अधिकत फेरीवाले मार्फत करण्यात येणारी विक्री सकाळी ०८ ते दुपारी १२ वा. पर्यंत चालु राहतील.

**ज) कृषी व पशुवैदयकीय आस्थापना –**

- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेर उर्वरित क्षेत्रात कृषीसेवा केंद्र व संबंधित आस्थापना सुरु राहतील.

**ल) आरोग्य सेवा –**

- सर्व औषधांची दुकाने, तसेच ऑनलाईन औषध वितरण सेवा संपुर्ण कालावधीकरीता सुरु राहतील.
- सर्व खाजगी व सार्वजनिक वैदयकीय सेवा, पशुचिकीत्सा सेवा त्यांचे नियमित वेळेनुसार सुरु राहतील.
- वृदध, आजारी व्यक्तींना नियुक्त केलेले मदतनिस यांच्या सेवा सुरु राहतील.

Scanned by CamScanner

- संस्थात्मक अलगिकरण/विलगीकरण व कोविड केअर सेंटर करता महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या व मान्यता दिलेल्या कार्यालयाच्या जागा, इमारती नियमानुसार सुरु राहतील.

**म) ई-कॉमर्स/ ई-सर्व्हिसेस -**

- झोमॅटो, स्वीगी व तत्सम ऑनलाईन पोर्टलवरुन मागविले जाणारे खादयपदार्थ पुरवठा सेवा दि.१४/०७/२०२० ते दि. २३/०७/२०२० रोजी पर्यंत बंद राहतील.
- **ई-कॉमर्स सेवा उदा. अमेझॉन, फ्लीपकार्ट व तत्सम सेवा दि.१४/०७/२०२० ते दि. १८/०७/२०२० रोजी पर्यंत बंद राहतील. तद्नंतर दि. १९/०७/२०२० रोजी पासुन चालु राहतील.**
- जीवनावश्यक वस्तुंचे, औषधांचे व तयार अन्नपदार्थाचे घरपोच वाटप सकाळी ०८:०० ते रात्री १०:०० या कालावधीतच मनपाच्या पुर्व मान्यतेने पास घेवुन अनुज्ञेय राहील.

**न) सार्वजनिक उपयोगिता सेवा –**

- **पेट्रोलपंप व गॅसपंप सकाळी ०९.०० ते दुपारी ०६.०० या वेळेत सुरु राहतील व ते केवळ शासकीय वाहने, अत्यावश्यक सेवेतील पुरवठा साखळीतील वाहने तसेच पासधारक वाहनांना इंधन पुरवठा करतील.**
- एलपीजी गॅस सेवा घरपोच गॅस वितरण नियमानुसार राहील.
- पाणीपुरवठा करणारे टँकरला नियमानुसार परवानगी राहील.

**य) पासेस बाबत –**

संचारबंदीचे कालावधीत अत्यावश्यक/ जीवनावश्यक बाबींसाठी प्रवास करावयाचा असल्यास पास घेणे आवश्यक आहे. सदरचे पास पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत मनपा कार्यालयाकडुन व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील महानगरपालिका हद्दीखेरीज इतर क्षेत्राकरिता संबधित पोलीस स्टेशन यांचेकडून पासेस अदा करण्यात येतील. तसेच अत्यावश्यक कारणाकरिता अंतरजिल्हा व अंतरराज्य प्रवासासाठी covid19.mhpolice.in या संकेत स्थळावर ई पासेस निर्गमित करण्यात येतील.

**प) असुरक्षित व्यक्तींच्या संरक्षणाबाबत -**

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, अतिजोखमीचे आजार (मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा, यकृत व मुत्रपिंडाचे आजार, कर्करोग, एचआयव्ही बाधित रुग्ण इ.) असलेल्या व्यक्ती, विकलांग व्यक्ती, गरोदर महिला आणि दहा वर्षाखालील मुले यांनी अत्यावश्यक आणि वैदयकीय कारण वगळता घरातच थांबणे आवश्यक आहे.

**र) आरोग्य सेतुच्या वापराबाबत -**

१) आरोग्य सेतु ॲप हे कोरोना संसर्गाच्या संभाव्य जोखमीची अगोदर ओळख करण्यास मदत करते. आणि ते व्यक्तींस आणि समाजास ढाल म्हणुन मदत करते.
२) कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवण्याच्या दृष्टीने अनुरुप मोबाईल फोन असलेल्या १००% सर्व कर्मचा-यांनी आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.
३) नागरीकांनी त्यांच्या मोबाईल फोनवर आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्यांची आरोग्य विषयक दैनंदिन माहिती अदययावत करावी.

**टीप :-**

१) वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.
२) वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.
३) रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.
४) कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.
५) वरील सर्व नमद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लाग होणार नाही.

Scanned by CamScanner

७. नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे. **(उदा- मारक, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

८. सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक** १३.०७.२०२० **रोजी दिलेला आहे.**

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :-** १३.०७.२०२०

Scanned by CamScanner